करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्षे 34 वे
| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.३७ | पाने-१२ | दि.२०/०९/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.

Shweta Gift & Toys
लहान मुला-मुलींसाठी सर्व प्रकारच्या खेळणी व भेटवस्तू उपलब्ध !

श्रीराम मंदिर शेजारी,वेताळपेठ, करमाळा. (9822058106 / 9096416076)


आमचे मार्गदर्शक व बांधकाम ठेकेदार श्री.किशोर भगत यांचे चिरंजीव
श्री.प्रतिक किशोर भगत यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल... हार्दिक अभिनंदन !

श्री.अमोल ढवळे
शुभेच्छुक
अमोल ढवळे
मो.९८५०१२५५६१
प्रविण गायकवाड
करमाळा, जि.सोलापूर

# वाळू तस्करी - १९ प्रकरणात कारवाई - ५२ लाख ६२ हजाराचा दंड

## तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांची कारवाई

करमाळा : येथील तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांनी दक्षिण सोलापूर, कवठेमहाकाळ या ठिकाणी वाळू तस्करीवर जोरदार मोहिम आखली होती. तीच परंपरा करमाळा तालुक्यात सुरू केली असून आत्तापर्यंत १९ प्रकरणात कारवाई करण्यात आली असून त्यांना ५२ लाख ६२ हजार ३२५ रुपयाचा दंड आकारण्यात आला आहे.



वाळू प्रकरणात गुन्हेगारी वाढत आहे. गेल्या आठवड्यात कंदर येथे वाळू तस्करीतून मोठा गुन्हा घडलेला आहे. अशी गुन्हेगारी खपवून घेतली जाणार नाही. यापुढे वाळू चोरांवर मोक्काचा प्रस्ताव ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे वाळू चोरांनी सावध राहण्याची गरज आहे. करमाळा तालुक्यात सातबारा दुरुस्तीची तसेच रस्ता केसेस अशी प्रकरणे प्रलंबित आहेत. यासाठी लवकरच कॅम्प घेऊन ही प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे धोरण आहे. कुणबी दाखले लवकर देण्याबाबत करमाळा तहसील कार्यालयाचा विक्रम आहे. सर्वसामान्य नागरीकांनी आपल्या समस्यांसाठी थेट संपर्क साधावा.

...शिल्पाताई ठोकडे (तहसीलदार करमाळा) मो.८०८००३०९७९

१ एप्रिल २०२४ पासून वाळू तस्करीवर तहसीलदार ठोकडे यांनी विशेष लक्ष दिले आहे. त्यानूसार चार टिपर, तीन ट्रॅक्टर व बारा वाळू साठ्यांवर त्यांनी कारवाई केली आहे. यात जातेगाव, मौलालीमाळ, मिरगव्हाण, अर्जुननगर, वांगी व तरटगाव येथे टिपर व ट्रॅक्टर मधून बेकायदेशीर वाळू वाहतूक करणाऱ्यावर कारवाई करण्यात आली असून त्यांचेवर १५ लाख ६५ हजार ७५ रुपये दंडाची कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय वांगी, सोगाव, बिटरगाव श्री, कंदर येथे बेकायदेशीर वाळूसाठा करणाऱ्या १२ प्रकरणात कारवाई करण्यात आली असून त्यांचेवर ३६ लाख ९७ हजार ५० रुपये दंडाची कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय ५ मोठ्या बोटी व २ छोट्या बोटी जाळून नष्ट करण्यात आल्या आहेत. तहसीलदार ठोकडे यांच्या धडाकेबाज कारवाईमुळे वाळू माफियात घबराहट निर्माण झाली आहे.

ईशा पॅरामेडिकल & एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, करमाळा. ISO 9001:2015

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
ISO 9001: 2015 Certified
Diploma Course in
Agriculture Technology
कृषी तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम
पात्रता : १० वी पास
अभ्यासक्रमाचा कालावधी : 2 वर्ष
प्रवेश क्षमता : 30 विद्यार्थी
ADMISSION OPEN
कॉलेजची खास वैशिष्ट्ये...
● सुसज्ज इमारत ● तज्ञ शिक्षकवृंद
● प्रॅक्टीकलसाठी लॅब
करिअर संधी...
● ग्रामसेवक, कृषीसेवक, कृषी सहाय्यक इ. ठिकाणी शासकीय नोकरीस पात्र.
● स्वत:चे कृषी सेवा केंद्र उभारण्याची संधी. नर्सरी, प्रक्रिया उद्योग उभारण्यास संधी.
● विविध नामांकित बी-बियाणे, खते, किटकनाशके उत्पादीत कंपनीत नोकरी संधी
● सिंचन विभागात पाटकरी, कालवा निरीक्षक व इतर समकक्ष पदावर नोकरीची संधी.
● विविध कृषी पुरक उद्योग, माती व पाणी परीक्षण, रोपवाटिका उभारण्यास संधी व अनुदानास पात्र
लिमिटेड सीट.. तर आजच आपला प्रवेश निश्चित करा...!
पत्ता : सोलंकर बिल्डिंग, नगररोड, बायपास मॉर्डन जिम, २ रा मजला, करमाळा.
मो.9970930153, 9730033124

प्रगतीचे दरवाजे वेळेवर उघडले तरच विकास साधला जातो...!

## संपादकीय.............................................!

# तालुक्याला धनसाठा लाभला..!

प्रत्येक माणसाला विकास करण्याची संधी कधी ना कधी मिळते. अशा संधीच सोनं केलं तर प्रगती होते अन्यथा आपल्या पदरी आसलेलं दैन्य बळकटी धरून राहतं. जसं माणसाचं तसंच गावांच असतं. गावाच्या उध्दारालाही कधी ना कधी चांगली संधी मिळते, ती संधी सोडलीतर गावसुध्दा विकासापासून वंचीत राहतात. तीच गत तालुक्याची असते.

आपल्या तालुक्याचं असंच काही झालं आहे. 'पाणी म्हणजे जीवन' ज्यावर संपूर्ण मानवजातीचे तसेच पशू-पक्षाचे जीवन आणि वनस्पतीचे आयुष्यही त्यावरच अवलंबून असते. असे जीवन असणारे पाणी सध्या तालुक्याच्या सर्व क्षेत्रात उपलब्ध झाले आहे. तालुक्याच्या दोन्ही बाजूने सुरक्षा कवचासारखे थांबलेले आहे. मुळातच या तालुक्याची उभारणीच भीमा-सीना या दोन्ही नद्यांच्या मध्ये झाली आहे. त्यामुळे सुरुवातीला उजनी धरण झाले आणि तालुक्याच्या दक्षिण भागाचे भाग्य उजाळले आणि नंतर कोळगाव प्रकल्प पूर्ण झाल्याने उत्तरेकडील भागाचा भाग्योदय होत आहे. तालुक्याच्या सरहद्दीत या प्रकल्पामुळे कोळगाव, गौंडरे, निमगाव, हिवरे, हिसरे, मिरगव्हण, अर्जुननगर, भालेवाडी, करंजे, बोरगाव या गावांपर्यंत पाणी साचले जाते. थोडक्यात संगोबा बंधाऱ्या पर्यंत या पाण्याचा फुगवटा येवू शकतो. याच सीना नदीवर संगोबा, पोटेगाव, तरटगाव व खडकी येथे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधलेले आहेत. पोटेगाव बंधारा सोडला तर अन्य बंधाऱ्यात चांगले पाणी साचते. यावर्षी उजनी शंभर टक्के भरले असून कोळगाव धरणांत चांगली पाणी पातळी वाढली आहे. एखादा जोरदार पाऊस झाला की हे धरणही शंभर टक्के भरणार यात शंका नाही. त्यामुळे यावर्षी तालुक्यात सीना नदीच्या संपूर्ण हद्दीत पुढील काही महिने पाणी राहणार आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांचे सोनं उगवण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकणार आहे.

कोळगाव प्रकल्प हा ५.३०० टी.एम.सी. क्षमतेचा प्रकल्प आहे. यामध्ये ७४.३० दशलक्ष घन मीटर पाणी मृत साठा असून ७६.१९ दश लक्ष घन मीटर उपयुक्त पाणी साठा आहे. यावर्षी हा प्रकल्प शंभर टक्के भरला तर या परिसराला फायदाच फायदा आहे. विशेष म्हणजे हा प्रकल्प कॅनॉलव्दारे पाणी देणारा नसून तो साठा प्रकल्प आहे. यातून उचलून पाणी घेण्याला परवानगी आहे. कोळगाव प्रकल्पाने फारसे पुर्नवसन झाले नाही, फार नुकसान झाले नाही,परंतू फायदा मात्र शंभर टक्के होत आहे. उजनी मध्ये शंभर टक्के पाणी आहे. कुकडीच्या टप्प्यात भरपूर पाणी आहे. मांगी प्रकल्प भरला आहे, तालुक्यातील अन्य छोटी-मोठे प्रकल्प पाण्याने भरले आहेत. म्हणजे या वर्षीतरी चोहोकडे पाणीच पाणीच आहे.

सध्या तालुक्यातील वेगवेगळ्या भागात उसाची लागवड मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. काही भागात केळी लागवडी वर लक्ष केंद्रीत केले आहे. तर काही ठिकाणी फळबागा लागवड केली जात आहे. वास्तविक पाहता या वर्षी संपुर्ण तालुक्याला शेतीसाठी पाणी मिळण्याची शक्यता आहे. यासाठी दहिगाव उपसा सिंचन व कुकडीचे पाणी याचे नियोजन करावे लागणार आहे. या पाण्याचे योग्य नियोजन म्हणजे नेमके कोणते पीक घ्यायचे व त्यातून फायदा कसा मिळवायचा ? हे शेतकऱ्यांनी धोरण आखून ठरवले पाहिजे. जर भरमसाठ ऊसच लावला तर तालुक्यात चार साखर कारखाने तसेच बारामती ॲग्रो, अंबालिका, श्रीराम हाळगाव असे साखर कारखाने असूनही ऊस गाळपाचा प्रश्न लोंबकळत रहातो. कारखाने, वाहन मालक, ऊसतोड मजूर शेवटच्या टप्प्यात शेतकऱ्यांना अक्षरश: लुटतात. त्यावेळी ऊस उत्पादकाला ऊस लावल्याचा पश्चात्ताप होतो पण त्यावेळी वेळ गेलेली असते. त्यामुळे अनेक दिवसानंतर शेतीसाठी पाणी मिळत आहे. त्याचा नेमका कसा फायदा घ्यायचा हे शेतकऱ्यांनी अत्तापासूनच ठरवायला पाहिजे. आणखी एक गोष्ट म्हणजे जेंव्हा शेतीला पाणी असते तेंव्हा वीजेची टंचाई ही ठरलेली असते. वीज टंचाईमुळे मेहनत व वारेमाप केलेला खर्च या दोन्हीवर पाणी पडते. त्यानंतर तयार झालेल्या पीकाचा बाजारभाव हा ही एक प्रश्न असतो. त्यामुळे शेतात काय पीकते, त्यापेक्षा बाजारात काय विकते, हे धोरण समोर ठेवून शेती करावी लागणार आहे

राजकर्ते मंडळीनी वीजेचा प्रश्न सोडवला पाहिजे, तसेच साखर कारखाने चालवताना वशिला ही पध्दत बंद करून , लागण कधी झाली त्यावर ऊस तोडीचे धोरण आखले पाहिजे तरच सामान्य शेतकऱ्यांना न्याय मिळेल. खरंतर इतराकडून न्याय मिळवण्यापेक्षा शेतकऱ्यांनी स्वत:च न्याय मिळवण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. त्यासाठी द्राक्ष, केळी, लिंबु, पोपई अशा फळबागा, कांदा, मिरची, भाजीपाला याशिवाय नर्सरी,पॉलीहाऊस मधील शेती तसेच हंगामनिहाय पीके घेतली पाहिजे. जे आपण सहज विकू शकू यावर भर दिला पाहिजे. असे केलेतरच निसर्गाने दिलेल्या वरदानाचा फायदा घेता येईल अन्यथा 'नशीब देते व कर्म नेते' अशी स्थिती होवू शकेल. त्यामुळे मिळेल्या या धनसाठ्याचा लाभ कसा घ्यायचा हे प्रत्येक शेतकऱ्यांने आत्ताच ठरवले पाहिजे...!

## फोटोग्राफर असो; मार्फत पालखीतून कॅमेऱ्याची मिरवणूक



करमाळा(सं.प्र.) : जागतिक छायाचित्र दिनानिमित्त फोटोग्राफर बांधवाच्या वतीने पालखीतून कॅमेऱ्याची मिरवणूक करमाळा शहरातून काढण्यात आली. सर्व महापुरूषांच्या स्मारकांना पुष्पहार अर्पण करत व कुंडीतील रोपाला पाणी घालून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी कॅमेऱ्याचे पूजन केले. यावेळी अध्यक्षस्थानावरून यशकल्याणीचे गणेश करे-पाटील म्हणाले, की छायाचित्र हा छंद किंवा व्यवसाय म्हणून जोपासला जात असलातरी त्यासाठी कलात्मक दृष्टी आवश्यक असते. सध्या व्यावसायिक छायाचित्रकारासाठी मोबाईल स्पर्धक ठरत असल्याचे चित्र आहे. करमाळा शहरामधून जागतिक छायाचित्र दिनानिमित्त फोटोग्राफर बांधवाच्या वतीने पालखीतून कॅमेऱ्याची मिरवणूक काढून त्यांनी आपल्या व्यवसायाप्रती कृतज्ञता व्यक्त करत नवा आदर्श समाजासमोर उभा केला आहे. यावेळी व्यासपीठावर पुणे फोटोग्राफर असो; चे अध्यक्ष अभय कापरे, पुणे फोटो फेअरचे आयोजक सुमित जैन, दौंड तालुका फोटोग्राफर असो; चे राजेंद्र खैरे, सचिन गायकवाड यांनी आपले विचार व्यक्त करत उपस्थितांना आदर्श व्यावसायिकता निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन केले.

यावेळी करमाळा तालुका फोटोग्राफर्स ॲन्ड व्हीडीओ ग्राफर्स असो; चे सदस्य योगेश ठोंबरे, सुधीर चोपडे, मनोज ढेरे, राज मुसळे, ओंकार कदम, महेंद्र मांडगे, देविदास कोठावळे, अनिकेत राऊत, गणेश इरकर, निलेश चांदगुडे, लखन कोठावळे, सुनील जगताप, नागनाथ सातपुते, प्रविण वीर, ऋषीकेश आमृळे, बापू पवार, बाळू सलगर, राज झिंजाडे, दादा गाडे, प्रमोद वैद्य, अनिल शेंडे, गणेश गलांडे उपस्थित होते. उपस्थित पाहुण्यांचे स्वागत निलेश विधाते, प्रास्ताविक बबन आरणे व सुत्रसंचालन अमृता आरणे यांनी केले. उपस्थितांचे आभार नागेश सातपुते यांनी मानले.

## करमाळा कारागृहात कायदेशीर जागरूकता शिबीर संपन्न




करमाळा(सं.प्र.) : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश सलमान आझमी व सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यु.पी.देवर्षी तसेच तालुका विधी सेवा समिती अध्यक्षा एम.पी. एखे यांचे मार्गदर्शनखाली करमाळा येथील कारागृहात कायदेशीर जागरूकता शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरास विधी सेवा समिती अध्यक्षा तथा दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर एम.पी. एखे यांचेसह बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.आर.ए.बरडे व सदस्य, तहसीलदार शिल्पा ठोकडे, पोलीस निरीक्षक विनोद घुगे व अधिकारी उपस्थित होते. यावेळी ॲड.एन.बी.राखुंडे यांनी प्ली बार्गेनिंग, ॲड.व्ही.जे.चौरे यांनी कैद्यांचे अधिकार, ॲड.पी.व्ही.बागल यांनी जामिनाच्या तरतुदी या विषयांवर मार्गदर्शन केले. पोलीस निरीक्षक घुगे व तहसीलदार ठोकडे यांनी सर्व कायदेविषयक विशेष मार्गदर्शन केले.

## सरकार मित्र मंडळाच्या वतीने अथर्वशीर्ष पठनाचा कार्यक्रम संपन्न

करमाळा(सं.प्र.) : सरकार मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सव कालावधीत सलग तीन दिवस सामुहिक अथर्वशीर्ष पठनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून सामुहिक अथर्वशीर्ष पठन केले. तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात पहिल्या दिवशी ७८ महिलांनी, दुसऱ्या दिवशी १३८ महिलांनी तर तिसऱ्या दिवशी १५१ महिलांनी सहभाग दर्शविला. तीन दिवसाच्या कार्यक्रमात महिला भगिणींनी पूर्ण एक तास खड्या आवाजात अथर्वशीर्ष पठण करून हजारो पाठ घडवले. अथर्वशीर्ष पठणानंतर सहभागी महिलांच्या हस्ते श्री ची आरती करण्यात आली. सरकार मंडळाच्या वतीने महिलांना चहापान, मसाला दुधाचे वाटप करण्यात आले. याशिवाय सहभागी महिलातून लकी ड्रॉ पध्दतीने दररोज सात पैठण्या प्रमाणे एकूण २१ पैठण्या आणि शालीमार गोल्डच्या वतीने दररोज ५०० रूपयाचे दहा गिफ्ट व्हाऊचर्स प्रमाणे एकूण ३० गिफ्ट व्हाऊचर्स अशी एकूण ५१ बक्षिसेही काढण्यात आली. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सरकार मित्र मंडळाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# करमाळ्यात पारंपारिक बॅन्जो कलाकारांनी नागरीकांना केले मंत्रमुग्ध




करमाळा (सं.प्र.): आधुनिक डीजे संगीताच्या वाढत्या प्रचलनासोबतच आरोग्यावर होणाऱ्या हानीकारक परिणामांपासून जनतेचे लक्ष वेधण्यासाठी करमाळा शहरातील राशीनपेठ तरूण सेवा मंडळ, गजराज मित्र मंडळ व नवजवान सुतार तालीम तरूण मंडळ या तीन प्रमुख गणेश मंडळांनी बॅन्जो वाद्यांवर आधारीत एक स्पर्धा आयोजित केली. या अनोख्या स्पर्धेचा नागरीकांनी पुरेपूर आनंद लुटला. यावेळी दत्तपेठ तरूण मंडळाच्या वतीने सर्व मंडळाचे व बॅन्जो पार्टी मालकांचे स्वागत व सन्मान करण्यात आला. बॅन्जो पार्टीने श्री गणेश वंदना, इतर सुमधूर गीतांची मनमोहक सादरीकरण केले. या कार्यक्रमाचा उद्देश पारंपारिक वाद्यसंस्कृतीचे जतन आणि प्रोत्साहन देणे हाच होता. ज्यामध्ये बॅन्जो कलाकारीच्या माध्यमातून लोकांना डीजे संगीताच्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली गेली.

# राशीनपेठ तरूण सेवा मंडळाच्या वतीने गणेशोत्सव पारंपारिक पध्दतीने साजरा




करमाळा(सं.प्र.) : राशीनपेठ तरूण सेवा मंडळाच्या वतीने गणेशोत्सव थाटामाटात व पारंपारिक पध्दतीने साजरा करण्यात आला.

गणेश आगमन मिरवणुकीत लेझीम, टाळ वाद्ये, ढोलताशा आणि बॅन्डच्या गजरात उत्साही वातावरणाची निर्मिती झाली. यामध्ये शहरातील लोकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन गणपती बप्पाचे स्वागत केले. गणेशोत्सव कालावधीत मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रक्तदान शिबीर, श्रीराम प्रतिष्ठानच्या अन्नपूर्णा योजनेसाठी अन्नदान, पांजरापोळ गोरक्षण संस्थेच्या गोशाळेला चारा व पेंड वाटप इ. सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. तसेच पिंगळा हा सामाजिक संदेश देणारा सजीव देखावा देखील मंडळाच्या वतीने सादर करण्यात आला. यामुळे गणेश भक्तांमध्ये पर्यावरणस्नेही विचारांचा प्रसार झाला. मंडळाने केलेली ही कलात्मक मांडणी प्रेक्षकांच्या विशेष कौतुकास पात्र ठरली.

विसर्जन मिरवणूक देखील दिमाखदार पध्दतीने पार पडली. व्यंकटेश रथ, पारंपारिक हलगी पथक, लेझीम पथक आणि सरगम म्युझीकल बॅन्जो ग्रुपच्या तालावर गणेश भक्तांनी बाप्पाला निरोप दिला. गणेशोत्सवाची यशस्वी मांडणी करण्यासाठी राशीनपेठ तरूण सेवा मंडळाचे सर्व सदस्य, मित्र परिवार आणि देणगीदारांचे मोलाचे सहकार्य लाभले.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
**फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !**

**सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर भरघोस डिस्काउंट**

**उपवासाचे पदार्थ**

**रेडिमेड स्नॅक्स**
- खजुर (लाल व काळी)
- सिडलेस खजुर (लाल व काळी)
- राजगिरा लाडू (गुळाचे व साखरेचे)
- गुळाची चिक्की (शेंगदाणा, राजगिरा वडी, कोकोनट, राजगिरा-शेंगदाणा मिक्स पिनट बटर, शेंगदाणा क्रश चिक्की)
- गुलकंद राजगिरा वडी व रोल
- नायलॉन शाबुदाणा (गोड व तिखट)
- केळी चिप्स् (तिखट व मीठाचे)
- बटाटा वेफर्स (तिखट व मीठाचे)
- बटाटा चिलीमिली
- बटाटा चिवडा (गोड व तिखट)
- राजगिरा लाही
- गावरान खारे शेंगदाणे
- भरूच खारे व नारळपानी शेंगदाणे
- तिखट शेंगदाणे
- लक्ष्मीनारायण बटाटा चिवडा (शेंगदाणा तेलातील)
- उपवास शाबुदाणा खाकरा
- उपवासाचे गोड लिंबू लोणचे
- शेंगतेल
- शेंगदाणे (घुंगरू व गावरान)
- शाबुदाणा (कॅमल, सिध्दी, लुज)
- इन्स्टंट बारीक शाबुदाणा (कॅमल, सिध्दी)
- पॅकींग सायकल भगर
- राजगिरा इ.



**काटदरे उपवास पीठ**
- राजगिरा पीठ
- उपवास भाजणी पीठ
- शिंगाडा पीठ
- सोमवार भाजणी पीठ (भगर विरहित)

**[illegible]**
- बटाटा पापड
- बटाटा - भगर पापड
- बटाटा व शाबुदाणा
- रंगीत पापडी
- शाबुदाणा पापडी
- बटाटा बॉबी, बटाटा वेफर्स
- बटाटा खिस
- बटाटा शेव, बटाटा स्क्रु
- शाबुदाणा बॉबी

※ टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !

॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
**एव्हरफ्रेश सुपरमार्ट**
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥

*नियम व अटी लागू

किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॉ
नॅचरल प्रॉडक्ट्स् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य

**पंढरपूर अर्बन बँकेसमोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031**

# माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनच्या तालुका संघटक पदी रामदास कांबळे



करमाळा(सं.प्र.) : माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन मुंबई या सामाजिक संघटनेच्या करमाळा तालुका संघटक पदी प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामदास कांबळे यांची निवड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी केली आहे. रामदास कांबळे हे प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असतात. त्यांचे हे कार्य पाहून आपण त्यांची निवड केली असल्याचे बसवेकर यांनी सांगितले.

निवडीनंतर कांबळे म्हणाले, की आपण या पदावर राहून माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या व्यापक जनहितासाठी वापर करणार आहोत. तसेच सर्वसामान्य नागरीकांमध्ये व समाजामध्ये माहिती अधिनियम २००५ च्या प्रसार व प्रचार करण्याचे कार्य आपण करणार असल्याचे सांगितले. या निवडीबद्दल विविध स्तरातून कांबळे यांचे अभिनंदन केले जात आहे.

आपल्या मुला-मुलीच्या जीवनातील सर्वात अनमोल क्षण अधिक मंगलमय करण्यासाठी..

**सोनेरी क्षणाचे सोबती**
**महामुनी मंगल कार्यालय**

**कार्यालयाची वैशिष्ट्ये...**
- सर्व शुभकार्यासाठी हवेशीर व प्रशस्त हॉल
- वधुवरासाठी वातानुकुलीत/ए.सी. मेकअप रूमची सोय
- १५०० लोकांची क्षमता/स्वतंत्र डायनिंग हॉल
- करमाळा शहराच्या दीड कि.मी.अंतरावर
- प्रशस्त पार्किंगची सोय
- पाहुण्यांसाठी राहण्याची उत्तम सोय. आठ रूम उपलब्ध

**आजचं बुकींग करा**

संपर्क मो.9423326587, 8390902342
**पत्ता : संगोबा रोड, करमाळा., जि.सोलापूर**

# करमाळा शहर व तालुक्यात गणेश विसर्जन उत्साहात व शांततेत संपन्न





करमाळा(सं.प्र.) : दहा दिवसांच्या मुक्कामानंतर १७ सप्टेंबरला शहरातील घरगुती, बालमंडळे आणि सार्वजनिक मंडळांसह तालुक्यातील विविध ठिकाणी गणेश विसर्जन मिरवणुका उत्साहात पार पडल्या.

नाविन्यपूर्ण सजावट करून सजवलेले रथ, विविध डिजे, लेजर सिस्टीम, बॅन्जो पार्टी, लेझीम पथक, गुलालाची मुक्त उधळण, मिरवणूक मार्गावर खाद्य पदार्थांचे वाटप आणि शहरातील जामा मशिदीवरून सर्व गणेश मंडळांच्या मुर्तीवर पुष्पवृष्टी हे या मिरवणुकांचे प्रमुख आकर्षण ठरले. दुपारी चारच्या सुमारास श्रीदेवीचामाळ येथील मानाच्या पहिल्या गणपतीचे शहरात आगमन झाल्यानंतर त्याच्या मागोमाग लोकप्रिय हनुमान तरूण मंडळ, किल्ला विभाग लोकमान्य टिळक तरूण मंडळ व त्यांच्या पाठोपाठ इतर सर्व मंडळाच्या गणेश विर्सजन मिरवणुका मार्गस्थ झाल्या. राशीनपेठ तरूण सेवा मंडळ, गजराज तरूण मंडळ, फंडगल्ली लोकमान्य टिळक तरूण मंडळ, नवजवान सुतार तालीम तरूण मंडळ, जय महाराष्ट्र मित्र मंडळ, सरकार मित्र मंडळ, सहकार मित्र मंडळ, छत्रपती शिवाजी तरूण मंडळ, हिंदवी प्रतिष्ठान, हिंदू खाटीक तरूण मंडळ, खडकपुरा तरूण मंडळ, किल्ला विभाग मित्र मंडळ आदी मंडळाच्या डीजे आणि बॅन्जो पथकासह, ढोल-ताशा व लेझीम पथकांनी या मिरवणुकांना शोभा आणली. किल्ला विभागातील जुन्या मुख्याधिकारी निवासस्थाना समोर नगरपालिकेच्या वतीर्न सर्व गणेश मंडळाचे स्वागत करण्यात आले. नगरपालिकेच्या वतीने नगरपालिकेसमोर तसेच घोलपनगर येथील घोलप विहिर व जुन्या विश्रामगृह जवळील सातनळाची विहिर येथे नगरपरिषदेकडून विसर्जन कुंडांची तसेच निर्माल्यपात्रांची सोय करण्यात आली होती.

मिरवणुकी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

पैगंबर जयंतीचे औचित्य साधून सकल मुस्लिम समाजाच्या वतीने मिरवणुकीत सहभागी सर्वांना शेरणी प्रसादाचे वाटप करण्यात आले. मुस्लिम समाजासह शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सूरज कांबळे यांनी तर वेताळपेठ येथील राम मंदिर येथे शहरातील सकल सिंधी समाजाच्या वतीने गणेश भक्तांना अल्पोपहार व पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती. फुलसौंदर चौक येथील जामा मस्जिद वरून भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम फाउंडेशन आणि सकल मुस्लिम समाजाच्या वतीने प्रत्येक मंडळाच्या श्रींच्या मुर्तीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच प्रत्येक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह शहरातील प्रतिष्ठीत नागरीकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन प्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

# निलज येथील दुरगुडे यांनी स्वत:ची देशी गाय गोवंश शाळेत केली दान



करमाळा(सं.प्र.): अखिल भारत कृषी गोसेवा संघ यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत निलज येथील कुलदीप दुरगुडे यांनी स्वत:ची खिल्लार जातीची देशी गाय गोसेवा संघाशी संपर्क साधून गोवंश गोशाळेत दान केली. यावेळी संघाच्या वतीने गायीचा गोशाळेत चांगल्याप्रकारे सांभाळ होईल; असा विश्वास दुरगुडे यांना दिला. शेतकऱ्यांनी आम्हाला एकही रूपया नको, फक्त गोवंशाचा मरेपर्यंत व्यवस्थित सांभाळ व्हावा अशा शब्दात आपले गोप्रेम यावेळी व्यक्त केले. गोवंश सुखरूपपणे पांजरपोळा येथे सोडण्यात आला. गोवंशाचा वाहतूक खर्च किल्ला विभाग येथील लोकमान्य टिळक तरूण मंडळाकडून करण्यात आला. ज्यांना शेतकऱ्यांना गोवंश दान करायचे आहेत, अशांनी करण आलाट (७२४९५०३७२२), संकेत दयाळ (७७६७९९०२०३), वनराज घोलप (७७३७१११५१५), कृष्णा देशपांडे (७७९६८३१०४५) यांच्याशी संपर्क साधावा; असे आवाहन अखिल भारत कृषी गोसेवा संघ, करमाळा व बजरंग दल गोरक्षा करमाळा यांचे वतीने करण्यात आले आहे.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर





म.गांधी विद्यालय, करमाळा ची विद्यार्थीनी व सुमंतनगर येथील रहिवाशी असलेली
कु.लक्ष्मी सूरज जाधव हिने
नागनाथ बोळगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली १४ वर्षे वयोगटातील जिल्हास्तरीय शालेय तालवारबाजी स्पर्धेत सेंसर प्रकारात दुसरा क्रमांक मिळवून तिची विभागीय स्तरावर पुणे येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी तसेच पिनजॉक शिलाईट प्रकारातील स्पर्धेसाठी मुंबई येथे निवड झाल्याबद्दल.. हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
• वीर शिवाजी मर्दानी खेळ, सुमंतनगर, करमाळा.
• समस्त जाधव परिवार, सुमंतनगर, करमाळा.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
• प्लंबींग • हार्डवेअर
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

# डॉ.दिपक पाटील यांचा राष्ट्रीय आयुषरत्न पुरस्काराने सन्मान

करमाळा (सं.प्र.) : येथील आयुर्वेद तज्ञ डॉ.दिपक सुर्यकांत पाटील यांना उत्तराखंड राज्यातील मसुरी येथे आमंत्रित करून राष्ट्रीय आयुषरत्न पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. उत्तराखंड आयुर्वेद विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ.मिश्रा व कुलपती डॉ.त्रिपाठी, आयुष मंत्रालयाचे डॉ.द्विवेदी यांचे हस्ते डॉ.पाटील यांना हा पुरस्कार देण्यात आला. याच परिषदेत डॉ.दिपक पाटील यांचे आयुर्वेद – मर्म – चिकित्सा या विषयावर देखील व्याख्यान झाले. आयुष भारत सरकार, उत्तराखंड राज्य विभाग, उत्तराखंड आयुर्वेद विश्वविद्यालय व संजीवनी फाऊंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने ५ वी ग्लोबल आयुष राष्ट्रीय शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत देश–विदेशातून आयुषच्या



आपापल्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या डॉक्टरांना निमंत्रित करण्यात येत असते. डॉ.दिपक पाटील यांच्या आयुर्वेद क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना या परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आले होते.

# विजयसिंह मोहिते-पाटील शिक्षक पतसंस्थेची २१ सप्टेंबरला वार्षिक सभा

करमाळा (सं.प्र.) : विजयसिंह मोहिते–पाटील प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २१ सप्टेंबरला दुपारी १.३० वा. कमलाई मंगल कार्यालय, पांडे येथे संस्थेचे चेअरमन दत्तात्रय जाधव यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी यावेळी संस्थेच्या सदस्यांनी या सभेस उपस्थित रहावे; असे आवाहन सचिव संतोष शितोळे यांनी केले आहे.

## करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या; करमाळा

### विशेष सर्वसाधारण सभेचे सूचना पत्र

करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या; करमाळा या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२९/९/२०२४ रोजी दुपारी १.०० वा. यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या पाठीमागील सभागृह, करमाळा येथे विद्यमान चेअरमन श्री.आदिनाथ भानुदास देवकते यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करून मंजूर करणेसाठी आयोजित केली आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे; ही नम्र विनंती !

**• सभेपुढील विषय •**

१ : मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२ : सन २०२३–२०२४ अखेरचा वार्षिक अहवाल, तेरीज पत्रक, नफा–तोटा पत्रक, ताळेबंद पत्रकास मान्यता देणे.
३ : सन २०२३–२०२४ या सालच्या नफा विभागणीस मा.संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे मंजुरी देणे.
४ : सन २०२२–२०२३ च्या ऑडीट मेमो दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
५ : सन २०२३–२०२४ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
६ : दि.१/४/२०२३ ते ३१/३/२०२४ या वर्षात अंदाजपत्रकापेक्षा झालेल्या कमी–जास्त खर्चास मान्यता देणे.
७ : सन २०२४–२०२५ सालचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
८ : सभासद सहाय्यता ठेव निधी जमा करणेस मंजुरी देणे.
९ : सन २०२४–२०२५ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
१० : वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची रजा मंजुर करणेबाबत.
११ : सन २०२३–२०२४ मधील संचालक मंडळाच्या मासिक सभेस मंजुरी देणेबाबत.
१२ : संस्थेचे सभासद मयत निधी संदर्भात चर्चा करून तरतूद करणेबाबत.
१३ : संस्थेच्या पोटनियम दुरुस्तीबाबत विचार विनिमय करणे.
१४ : मा.अध्यक्षाच्या परवानगीने आयत्या वेळेस आलेल्या विषयावर चर्चा करणे.

दि.१९/९/२०२४ — संचालक मंडळाच्या मान्यतेवरून


**अजित जालिंदर कणसे** सचिव — **तात्यासाहेब भिमराव जाधव** व्हा.चेअरमन — **आदिनाथ भानुदास देवकते** चेअरमन

टीप : १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चा नियम क्र.२२ प्रमाणे प्रारंभी गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी एक तासानंतर घेण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता असणार नाही. २) वार्षिक सभेत मंजुर केलेल्या दराने लाभांश रक्कम सभासदांच्या बँक बचत खातेवर जमा केली जाईल. ३) सभासद पाल्य बक्षीस योजनेत सहभागी होणेसाठी प्रमाणपत्र झेरॉक्स व अर्ज दि.२५/९/२०२४ अखेर जमा करावेत. (नवोदय प्रवेश, शिष्यवृत्ती पात्र, सैनिक स्कुल, इ.१० वी, इ.१२ वी, NEET, JEE, CET वरील परीक्षेमध्ये संस्थेस प्राप्त झालेल्या अर्जामधून गुणानुक्रमे प्रत्येक ५ विद्यार्थी पात्र असतील. संस्थेच्या कामकाजाबद्दल सुचना अथवा प्रश्न विचारावयाचे असल्यास लेखी पत्राद्वारे कळवावेत.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर–बारामती–सोलापूर खुशखबर



बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)



आता आपल्या करमाळ्यात !

उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे
● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा
● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर
● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार अनिल यादव व सुवर्णा जाधव यांना प्रदान





करमाळा(सं.प्र.) : शिक्षक दिनानिमित्त प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांचे वतीने देण्यात येणारा जिल्हास्तरी आदर्श शिक्षक पुरस्कार उमरड जि.प.शाळेचे शिक्षक अनिल यादव व वांगी नं. जि.प.शाळेच्या शिक्षिका सुवर्णा सर्जेराव जाधव यांना प्रदान करण्यात आला.

मागील वर्षी मुख्यमंत्री माझी शाळा – सुंदर शाळा या स्पर्धेत तालुक्यात दुसरा क्रमांक मिळवून देण्यामध्ये यशस्वी, उत्तम शालेय कामकाज व उत्कृष्ट अध्यापन या बाबी ध्यानात घेऊन उमरड शाळेचे शिक्षक अनिल यादव यांना सर्वसाधारण विभागातून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. तसेच इ.५ वी मधील पाच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त करण्यात मोलाचे मार्गदर्शन,उत्कृष्ट अध्यापन बाबी ध्यानात घेऊन वांगी नं.१ शाळेच्या शिक्षिका सुवर्णा जाधव यांना शिष्यवृत्ती विभागातून सदरचा पुरस्कार देण्यात आला. सदर पुरस्काराचे वितरण पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचेसह जिल्हाधिकारी, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी, आमदार, खासदार यांचे उपस्थितीत करण्यात आले. आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त अनिल यादव व सुवर्णा जाधव यांचे तालुक्यातून विशेष अभिनंदन करण्यात येत आहे.

# ज्योतिर्लिंग गणेश मंडळाच्या वतीने माजी सैनिक व नवनियुक्त अधिकारी यांचा सन्मान



करमाळा(सं.प्र.) : कुंभेज येथील ज्योतिर्लिंग गणेश मंडळाच्या वतीने १९९९ च्या कारगील युध्दात सहभागी झालेले आजी–माजी सैनिक कल्याणकारी संघटना करमाळा तालुका अध्यक्ष अक्रुर शिंदे तसेच १९७१ साली झालेल्या भारत–पाकिस्तान युध्दात सहभागी झालेले माजी सैनिक मोहन मुटके व माजी सैनिक जालिंदर कन्हेरे यांनी सहभाग घेऊन देशसेवा यशस्वीपणे बजावली. त्याबद्दल त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच सरळ सेवेतून काजल किसन शिंदे हिची कालवा निरीक्षक व प्राची मोहन कादगे हिची नागपूर शहर पोलीस म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचाही मंडळाच्या वतीने गौरव करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी माजी सैनिक बाळासाहेब शिंदे, बिभिषण कन्हेरे, देवराव शिंदे, सुभाष मुटके यांचेसह मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व सदस्य तसेच सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते. सुत्रसंचालन अमोल मुटके यांनी केले तर आभार गणेश शिंदे यांनी मानले.

एन.ए.प्लॉट विकणे आहे
सिंचननगर मधील १९२ चौ.मी. (४० X ५३) कॉर्नर
एन.ए.प्लॉट योग्य किंमतीत विकणे आहे.
संपर्क : मो.9423237685



आमचे मित्र व बांधकाम ठेकेदार **श्री.किशोर भगत**
यांचे चिरंजीव

# मा.श्री.प्रतिक किशोर भगत

यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या
परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल

## हार्दिक अभिनंदन



शुभेच्छुक

- अ‍ॅड.सुधाकर वांगडे
- श्री.रामकृष्ण माने
- श्री.नितीन दोशी
- व मित्र परिवार, करमाळा.

---



॥ श्री विठ्ठल-रुक्मीणी प्रसन्न ॥ ॥ संत ज्ञानेश्वर माऊली प्रसन्न ॥ ॥ संत तुकाराम महाराज प्रसन्न ॥

दु:खाचा डोंगर कोसळलेला असो, की सुखाचा वर्षाव होत असो..
मनाला चिंतेचे ग्रहण लागलेले असो, की आठवणींचे तारे लुकलुकत असो..
आठवते ती फक्त '**आई**'

**कै.सौ.लंकाबाई पितांबर नेटके** यांचे **प्रथम वर्षश्राध्द**

मित्ती भाद्रपद कृ.४ शके १९४६ शनिवार दि.२१/९/२०२४ रोजी दुपारी १२ वा. ०५ मि.
करण्याचे योजिले आहे. तरी पुष्पांजली वाहण्यास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे..!

## • त्रिदिनी सप्ताह •

| वार/दिनांक | किर्तनकार | हरिजागर |
|---|---|---|
| गुरूवार, दि.१९/९/२०२४ | **ह.भ.प.नवनाथ महाराज मुंगसे**<br>श्री दक्षिणमुखी हनुमान सेवा आश्रम नांदूर सुकळी<br>सायं.७.०० ते ९.०० | |
| शुक्रवार, दि.२०/९/२०२४ | **ह.भ.प.ह.भ.प.लालचंद महाराज चोपडे**<br>इंदापूर, जि.पुणे. सायं.७.०० ते ९.०० | ह.भ.प.सचिन महाराज गटकुळ (हिवरे)<br>ह.भ.प.प्रभाकर दादा वांगीकर |

शनिवार, दि.२१/९/२०२४ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत युवा किर्तनकार व समाजप्रबोधनकार
**ह.भ.प.नेहाताई अर्जुन भोसले-साळेकर** यांचे वर्षश्राध्दाचे किर्तन होईल व नंतर महाप्रसादाची पंगत होईल.

**मृदंगाचार्य**
**ह.भ.प.अर्जुन महाराज साळेकर**
(आंतरराष्ट्रीय मृदुंग वादक)
**ह.भ.प.कृष्णा महाराज महाडिक**
(आत्माराम बाबा शिक्षण संस्था, मांदळी)

**गायनाचार्य...**
**ह.भ.प.दिलीप महाराज मुळे**
(आत्माराम बाबा शिक्षण संस्था, मांदळी)
**ह.भ.प.देवा महाराज मांदळीकर**
(आत्माराम बाबा शिक्षण संस्था, मांदळी)
**ह.भ.प.सचिन महाराज गटकुळ** (हिवरे)

• किर्तनसाथ : आत्माराम बाबा शिक्षण संस्था, मांदळी • स्थळ : फिसरे, ता.करमाळा, जि.सोलापूर

शोकाकुल
श्री.पितांबर गणपत नेटके, श्री.सुभाष पितांबर नेटके, श्री.धनंजय पितांबर नेटके
समस्त नेटके परिवार (संपर्क : मो.८८३०७९९३९६, ९८२२४५३९१७)

आमचे मित्र व बांधकाम ठेकेदार श्री.किशोर भगत
यांचे चिरंजीव

# मा.श्री.प्रतिक किशोर भगत

यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल



## हार्दिक अभिनंदन



शुभेच्छुक

**साडेकर सेंट्रींग प्लेटस् अॅन्ड मटेरियल**
गणेशनगर, करमाळा., जि.सोलापूर
प्रोप्रा : अनिल साडेकर (9881175085)

## हार्दिक अभिनंदन



ईरम नसीम बेग



ओम संभाजी जगताप



रोहित गणेश चौकटे

श्री ज्ञानेश्वर वाचन मंदिर मुक्तद्वार वाचनालय करमाळा नगरपरिषद, करमाळा मार्फत चालविण्यात येणाऱ्या अभ्यासिकेत एम.पी.एस.सी. चा अभ्यास करणारे विद्यार्थी

**ईरम नसीम बेग (धाराशिव पोलिस)**
**ओम संभाजी जगताप (एस.आर.पी.एफ. सोलापूर)**
**रोहित गणेश चौकटे (अ.नगर जिल्हा न्यायालय)**

यांची शासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक

**दत्तात्रय भिकु घोलप** (ग्रंथपाल), **प्रदीप बाबुशा चौकटे** (ग्रंथालय मदतनीस)
**अमोगसिध्द सिध्दाराम परशेट्टी** (ग्रंथालय सेवक) व **अभ्यासिकेतील सर्व विद्यार्थी**
**श्री ज्ञानेश्वर वाचन मंदिर मुक्तद्वार वाचनालय क.न.प.करमाळा.**

ੴ
*In loving memory of*



हॉटेल शेरे पंजाब चे मालक
**मोहनशेठ गुलाटी** यांचे स्मृतीस

## भावपूर्ण श्रध्दांजली !

**आरंभता : श्री अखंड पाठ साहेब**
दि.२० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२.०० वा.

**समाप्ती : श्री अखंड पाठ साहेब**
दि.२२ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२.०० वा.
**स्थळ : पुणे रोड, करमाळा.**

**अंतिम अरदास**
दि.२२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते १
**किर्तन व गुरू का लंगर**
स्थळ : विकी मंगल कार्यालय, एस.टी.स्टॅन्ड समोर, करमाळा.

शोकाकुल

**समस्त गुलाटी व मल्होत्रा परिवार, करमाळा.**



मनी होता भोळेपणा, कधी न दाखविला मोठेपणा
चेहरा होता सदा हसमुख, सर्वांना दिला आनंद खूप
अजूनही होतो भास, तुम्ही आहात जवळपास..!

हॉटेल शेरे पंजाब चे मालक **मोहनशेठ गुलाटी** यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या कुटूंबियाच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची

## भावपूर्ण श्रध्दांजली !

शोकाकुल

**हॉटेल न्यु संगम** प्रोप्रा : चुंग परिवार, करमाळा.

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने
# लाडकी बहिण योजनेच्या समर्थनार्थ करमाळ्यात स्वाक्षरी मोहिम संपन्न







करमाळा(सं.प्र.) : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दहावा अर्थसंकल्प मांडताना खास महिलांसाठी लाडकी बहिण योजनेची घोषणा केली आणि राज्यातील लाडक्या बहिणींना महिन्याला १५०० रू. त्यांच्या खात्यावर जमा होणार अशी घोषणा केली. आत्तापर्यंत ८० टक्के महिलांच्या खात्यावर पैसे देखील जमा झाले. परंतु विरोधकांकडून वारंवार ही योजना बंद होणार असे सांगून महिलांची दिशाभूल करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर ही लाडकी बहिण योजना येणाऱ्या काळात पुढील अनेक वर्ष कायम चालू रहावी या समर्थनार्थ करमाळा शहरात राष्ट्रवादी युवक काँग्रेस तर्फे महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या समर्थनार्थ स्वाक्षरी मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेस महिलांनी अतिशय उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

हा उपक्रम आमदार संजयमामा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आव्हाड यांनी फुलसौंदर चौक करमाळा येथे आयोजित केला होता. या मोहिमेत स्थानिक महिलांनी व नागरीकांनी खूप मोठ्या प्रमाणात सहभागी होत स्वाक्षरी करत ही योजना यापुढेही अविरतपणे सुरू राहण्यासाठी पाठींबा दर्शविला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष अशपाक जमादार, ज्येष्ठ नेते विवेक येवले, महिला जिल्हा उपाध्यक्षा नंदिनी लुंगारे, युवक जिल्हा खजिनदार राजेंद्र सुर्यवंशी, मकसूद बागवान यांचेसह राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी
सोलापूर येथील त्वचारोग तज्ञ
**डॉ.संकेत मंडलेचा** MBBS, DDV (Pune)
**प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत**




**त्वचा विकार :** नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला

संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर
**अपॉईंटमेंट : मो.9423333904**

# शिवसेनेच्या वतीने मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींना पाच हजार वडापावचे वाटप

करमाळा(सं.प्र.): शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या नेतृत्वाखाली करमाळा शहरात ग्रामीण भागातून आलेल्या पाच हजार महिलांना अल्पोपहार म्हणून वडापावचे वाटप करण्यात आले. सदर स्टॉलचे उद्घाटन पोलीस निरीक्षक विनोद घुगे व विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष मिलींद फंड यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी लाडक्या बहिणींना स्वत:च्या पायावर उभा राहून लघुउद्योग सुरु करण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या विविध योजनांची माहितीपत्रके वाटप करण्यात आली. उपक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका उपाध्यक्ष डॉ.गौतम रोडे, ओबीसी आघाडीचे शहरप्रमुख अंकुशराव जाधव, शिवसेना शहरप्रमुख संजय शिलवंत, बांधकाम कामगार आघाडी प्रमुख बंडू काळे, अनुसूचित जाती जमाती संघटनेचे सदस्य माने, रंभापुरा शाखाप्रमुख निलेश चव्हाण, नागेश चेंडगे, बापूराव ढस, खांबेवाडी शाखाप्रमुख बाबासाहेब तोरणे आदींनी परिश्रम घेतले.

# प्रतिक भगत यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड



करमाळा(सं.प्र.): दोन वर्षाच्या प्रतिक्षेनंतर अखेर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच निकाल लागला असून त्यामध्ये करमाळा शहरातील बांधकाम ठेकेदार किशोर भगत यांचे चिरंजीव प्रतिक भगत हे उत्तीर्ण झाले असून त्यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली आहे. प्रतिक भगत हे मागील चार वर्षापूर्वी पुणे येथे अभ्यासाच्या निमित्ताने गेले. यावेळी त्यांनी स्पर्धा परीक्षेत सहभाग नोंदवला. मुख्य परीक्षेच्या पहिल्याच प्रयत्नात त्यांनी बाजी मारली आहे. पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्यामुळे त्यांचा करमाळा शहरात मिरवणूक काढून आनंद व्यक्त करण्यात आला. कोरोना काळात प्रतिक भगत यांनी काहीतरी होण्याचे ठरवले व स्पर्धा परीक्षेकडे लक्ष केंद्रीत केले. २०२२ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे.

दोन वर्षांनी का होईना आनंदाची बातमी मिळाल्याने भगत कुटूंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**प्रवेश..! प्रवेश..!! प्रवेश..!!!**





॥ सा विद्या या विमुक्तये ॥
बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाचे
**झाडबुके महाविद्यालय, करमाळा.**
हिवरवाडी रोड, करमाळा., जि.सोलापूर.

**B.C.A.**
(Bachelor of Computer Application)




**DTE Code : 16210**
Approved by AICTE Delhi, DTE Mumbai and Affiliated by P.A.H. Solapur University, Solapur
**• प्रथम वर्ष पदवी प्रवेश प्रक्रिया •**
अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता

| S.No | Name of Course | Intake |
|---|---|---|
| 01 | B.C.A. | 60 |

- प्रवेश पात्रता : इ.१२ वी (कला/सायन्स/एम.सी.व्ही.सी. (१०+२)
- B.C.A., C.E.T. नंतर CAP रजिस्ट्रेशन आवश्यक
- केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील (CAP) ऑप्शन फॉर्म भरण्यासाठी DTE Code : 16210 वापरावा अथवा कॉलेजमध्ये संपर्क साधावा.
- व्यवस्थापन कोट्यातील प्रवेशासाठी कॉलेजमध्ये संपर्क साधावा..!

संपर्क
प्राचार्य अतुल ढवळे (९४०४२७४२००), प्रा.घाटे मॅडम (८२०८८५७८५१)

**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रु. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

Shweta Gift & Toys
लहान मुला-मुलींसाठी सर्व प्रकारच्या खेळणी व भेटवस्तू उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106)

## कमलादेवी मंदिराच्या कामास इंदुमती लावंड यांचेकडून ११ हजाराची देणगी



करमाळा(सं.प्र.): श्री जगदंबा कमलादेवी मंदिर ट्रस्ट च्या संयोजकांनी श्री कमलादेवी मंदिर जतन व संवर्धन कामास गेल्या नऊ महिन्यांपासून सुरुवात करण्यात आली आहे. मंदिर जतन संवर्धनाचे काम प्रगतीपथावर असून ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे, सचिव अनिल पाटील व सर्व विश्वस्त यांनी मदतीचे आवाहन भक्तांकडे केले होते. या आवाहनास प्रतिसाद देत इंदुमती अंगद लावंड (रा.करमाळा) यांनी ११ हजार रूपयाची देणगी कमलादेवी ट्रस्टकडे दिली आहे. यानिमित्त त्यांचा सत्कार मंदिर समितीच्या वतीने विश्वस्त सुशिल राठोड, व्यवस्थापक अशोक गाठे यांनी केला. यावेळी ज्योतीराम लावंड, राज लावंड, रितेश लावंड व लावंड परिवार उपस्थित होते.

## चिखलठाण येथे जाणता राजा गणेश मंडळाच्या वतीने गुणवंतांचा सन्मान



करमाळा(सं.प्र.) : चिखलठाण येथील शुभम लगस व धनाजी राऊत यांची पोलीस पदी तसेच पांडूरंग लबडे यांची शेटफळ सरपंच पदी निवड झाल्याबद्दल जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड यांचे हस्ते चिखलठाण येथे सत्कार करण्यात आला.

हा कार्यक्रम जाणता राजा गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी बारकुंड यांनी नूतन अधिकाऱ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास सरपंच विकास गलांडे, जाणता राजा गणेश मंडळाचे अध्यक्ष समाधान गव्हाणे, राहुल गोळे, विठ्ठल राऊत, नितीन धेंडे, आबा नलवडे, रोहित कोकाटे, प्रमोद गव्हाणे, अक्षय कांबळे, महेश पवार, विशाल लोहार, माऊली कुचेकर, बापूराव गोळे, संतोष उंबरे, विश्वजीत रोकडे, प्रितम गोळे, धनराज गोळे व ग्रामस्थ उपस्थित होते.

जमीन विकणे आहे
साडे हद्दीतील कॅनॉलपासून जवळ असलेली २० एकर जमीन
योग्य किंमत आल्यास विकणे आहे
संपर्क : मो.8830115368, 9011984835

श्रीजी इस्टेट एजन्सी
लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
• घरजागा, दुकान जागा
• प्लॉट व बंगले
• जमीन बिनशेती करणे
• व्यवहार करून दिले जातील
• सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.
पत्ता : मेनरोड, करमाळा.

## शेटफळ येथे अज्ञात हिंस्र प्राण्याने केल्या तीन शेळ्या फस्त

### बिबट्या, तरस की लांडगा.. वनविभागही संभ्रमात

करमाळा(सं.प्र.): शेटफळ येथील बळीराम रोंगे यांच्या शेतातील गोठ्यात बांधलेल्या शेळ्यांवर अज्ञात प्राण्याने हल्ला करून तीन शेळ्या जागेवरच खाऊन फस्त केल्या आहेत तर तीन कोकरू ओढून दुसरीकडे नेल्याची घटना घड्याने शेटफळ परिसरामध्ये घबराहटीचे वातावरण निर्माण झाले आहे. या परिसरात बिबट्या असल्याची अफवा सर्वत्र पसरली आहे. या प्राण्याचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. सदर घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी सतीश ओढगे यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक अविनाश गायकवाड व वनपाल बाबासाहेब लटके यांनी घटनास्थळी भेट देऊन परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. घटनास्थळाचा पंचनामा केला असून त्यांना त्या ठिकाणी तीन अर्धवट खाल्लेल्या शेळ्या आढळून आल्या. या घटनेतील शेळ्यांवरील हल्ला करण्याची पध्दत लक्षात घेता, हा हल्ला बिबट्याचा नसून तरस किंवा लांडगा या प्राण्यांनी केला असावा; असा अंदाज वर्तविण्यात आला.

## प्रा.सचिन धेंडे यांना पुणे विद्यापीठाची पीएचडी पदवी प्रदान



करमाळा(सं.प्र.): शेटफळ येथील रहिवासी असलेले प्रा.सचिन धेंडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली आहे. प्रा.धेंडे हे श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात इतिहास विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. अहमदनगर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज मधील पदव्युत्तर संशोधन केंद्र समन्वयक डॉ.किसन मारूती अंबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.धेंडे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील दलित चळवळ आणि जागतिकीकरण : एक चिकित्सक अभ्यास (इ.स.१९९० ते इ.स. २०११) अशा महत्वपूर्ण विषयावर संशोधन करून पुणे विद्यापीठाकडे शोधप्रबंध सादर केला. या यशाबद्दल प्रा.धेंडे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## करमाळ्यात मंडल अधिकारी लाचलुचपतच्या जाळ्यात

करमाळा(सं.प्र.): कुणबी दाखला काढण्यासाठी मंडल अधिकाऱ्याचा चौकशी अहवाल देण्यासाठी लाच मागणारा केत्तूरचे मंडल अधिकारी शंकर विठ्ठल केकान याच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने करमाळा येथे कारवाई केली. याबाबत मंडल अधिकारी केकान यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंडल अधिकारी केकान याने तीन हजार रूपये लाच मागितली. यावर फिर्यादीने इतकी रक्कम देण्यास नकार दिला. तडजोडीअंती एक हजार रूपये देण्याचे ठरले. मात्र फिर्यादीस लाच देण्याची इच्छा नव्हती. त्यानंतर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर विठ्ठल केकान यांचेवर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांच्या पथकाकडून ही कारवाई करण्यात आली.

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

## आर्चरी (धनुर्विद्या) स्पर्धेसाठी
# वैष्णवी पाटील २७ सप्टेंबरला चीनला जाणार




करमाळा : करमाळा तालुक्यातील वरकुटे गावातील कु.वैष्णवी कुमार पाटील हिची आंतरराष्ट्रीय आर्चरी स्पर्धेसाठी (धनुर्विद्या) भारतीय संघात निवड झाली आहे. येत्या २७ सप्टेंबर पासून चीन येथील तैपेयी येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ती भारताचे प्रतिनिधीत्व करणार आहे. तिच्या निवडीबद्दल तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी विशेष अभिनंदन केले आहे.

कु.वैष्णवी पाटील (वय-१६) ही सातारा येथील लाल बहाद्दूर शास्त्री महाविद्यालयात ११ वी विज्ञान शाखेत शिक्षण घेत आहे. तिचे पहिली ते चौथी गुरूकुल पब्लिक स्कुल, पाचवी ते आठवी लिड स्कुल करमाळा व नववी ते दहावी पुन्हा गुरूकुल पब्लिक स्कुल मध्ये शिक्षण झाले आहे. तिचे वडील कुमार पंडितराव पाटील (वरकुटे मुर्तीचे) हे एकलव्य आश्रमशाळेत शिक्षक आहेत. आई सौ.अपर्णा पाटील या गृहिणी आहेत. दोघांच्या पाठबळावर वैष्णवी चा प्रवास करमाळा ते चीन असा होत आहे.

गुरूकुल पब्लिक स्कुल मध्ये वैष्णवी चौथीच्या वर्गात असताना तेथे अरण (ता.माढा) येथील दत्तात्रय चव्हाण हे कोच आले होते. त्यांनी तिच्यातील चुणूक पाहून आर्चरी (धनुर्विद्या) या क्रिडा प्रकारावर लक्ष देण्याची सूचना दिली. त्यानंतर वैष्णवीच्या वडिलांनी तिच्या वरती लक्ष केंद्रीत करून सातत्याने सराव करून घेतला. पुढे कोरोना कालावधी वगळता तिचा आर्चरीचा सराव कायम होता. तिच्या सरावासाठी ३ लाख ६० हजार रूपयाचे कंपाउंड बो हे घेऊन दिले. सन २०२२ पासून विठ्ठल भालेराव सरांकडे तिने सराव केला. त्यानंतर झालेल्या सलग चार स्पर्धेत तिने यश मिळविले. सध्या ती सातारा येथील दृष्टी आर्चरी अकॅडमीतील प्रविण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. हरियाणा येथील सोनीपत येथे २३ ते २९ ऑगस्टच्या दरम्यान झालेल्या निवड चाचणीत वैष्णवीची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली असून २७ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत चीन येथील तैपेयी येथे आर्चरीच्या स्पर्धा होणार आहेत. तेथे वैष्णवी भारताचे प्रतिनिधीत्व करणार आहे.

## करमाळा तालुका को.ऑप.अॅग्री परचेस अॅन्ड सेल युनियन लि; करमाळा.
### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

करमाळा तालुका को.ऑप.अॅग्री परचेस अॅन्ड सेल युनियन लि; करमाळा या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.३०/९/२०२४ रोजी दुपारी १.०० वा. संस्थेच्या मार्केट यार्ड, करमाळा येथील ऑफिस मध्ये बोलविणेत आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे; ही नम्र विनंती..!

**● सभेपुढील विषय ●**

विषय क्र.१ : मागील दि.३०/९/२०२३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

विषय क्र.२ : दि.१/४/२०२४ ते ३१/३/२०२५ या सालाकरीता संस्थेची बाहेरील कर्ज उभारणीसाठी मर्यादा ठरविणेबाबत.

विषय क्र.३ : दि.१/४/२०२४ ते ३१/३/२०२५ करीता तयार केलेले अंदाजपत्रक माहितीसाठी.

विषय क्र.४ : दि.१/४/२०२३ ते ३१/३/२०२४ सालचा लेखापरिक्षण अहवाल माहितीसाठी

विषय क्र.५ : दि.१/४/२०२३ ते दि.३१/३/२०२४ सालात कमी-जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणेबाबत.

विषय क्र.६ : दि.१/४/२०२४ ते दि.३१/३/२०२५ सालाकरीता वैयक्तीक लेखापरिक्षकाची नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.७ : मागील ताळेबंदातील अनामत, व्यापारी येणे-देणे, दिवाणी दावे दुरूस्त्या यावरती विचार करणे.

विषय क्र.८ : दि.१/४/२०२३ ते दि.३१/३/२०२४ मध्ये संचालक मंडळाने घेतलेल्या मासिक सभेस मान्यता देणेबाबत..

विषय क्र.९ : संस्थेचा जेऊर विभाग बंद करून तेथील जेऊर धान्य दुकान करमाळा विभागास जोडणेबाबत चर्चा करणे.

विषय क्र.१० : मा.चेअरमन साहेब यांचे पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

टीप : १) सोसायटी सभासदांनी वार्षिक सभेच्या कामकाजात भाग घेण्यासाठी पाठवावयाचा प्रतिनिधी त्या सोसायटीचा सभासद असला पाहिजे. त्याची निवड सोसायटीच्या पंचकमिटीने ठराव करून केलेली पाहिजे. सभासद सोसायटीस एकच प्रतिनिधी पाठविता येईल. त्या प्रतिनिधीच्या ठरावाची नक्कल सोसायटीचे चेअरमन व सेक्रेटरी यांचे सहीने सोसायटीच्या शिक्क्यानिशी संस्थेच्या कार्यालयात दि.२६/९/२०२४ पर्यंत दुपारी १ वा. पर्यंत मिळाली पाहिजे. २) संस्थेच्या सभासदास किंवा वैयक्तीक सभासदास संस्थेच्या कामकाजाविषयी प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी ते लेखी ऑफिस मध्ये दि.२६/९/२०२४ पर्यंत मिळतील अशा बेताने पाठवावे. तद्नंतर आलेले प्रश्न विचारात घेतले जाणार नाहीत. ३) कोरमअभावी सदरची सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी अर्धा तासाने त्याच ठिकाणी घेतली जाईल. अशा सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.

**श्री.विठ्ठल उमाजी तोरणे** (मॅनेजर) **श्री.शंभुराजे जयवंतराव जगताप**(चेअरमन)

**करमाळा तालुका को.ऑप.अॅग्री परचेस अॅन्ड सेल युनियन लि; करमाळा.**

## हॉटेल शेरे पंजाबचे मालक मोहनशेठ गुलाटी यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : हॉटेल शेरे पंजाबचे मालक मोहनशेठ भगतसिंह गुलाटी (वय-६३) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे. उपजिल्हा रूग्णालय समोरील दत्त मंदिराच्या पाठीमागील स्मशानभुमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शांत, संयमी आणि मितभाषी स्वभावाचे मोहनशेठ यांनी अत्यंत कष्टाने हॉटेल व्यवसायाच्या माध्यमातून प्रगती साधली. अलिकडील काळात प्रकृती अस्वस्थेमुळे त्यांच्यावर उपचार सुरू होते. मोहनशेठ यांच्या मागे आई, पत्नी, दोन मुले, दोन मुली असा परिवार आहे. जीन मैदान येथील गुरूकृपा ऑईल्सचे तेजस् (सोनुशेठ) मल्होत्रा यांचे ते मामा तर राज मेडिसीन गॅलरीचे आकाश गुलाटी यांचे ते चुलते होते.

## शिवसेना महिला आघाडी शहरप्रमुख पदी किर्ती स्वामी

करमाळा(सं.प्र.): करमाळा शहर शिवसेना शिंदे गट महिला आघाडी प्रमुख पदी किर्ती किरण स्वामी यांची निवड जिल्हाप्रमुख आरती बसवंती यांनी केली. निवडीनंतर किर्ती स्वामी म्हणाल्या, की संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे भाऊ झाले असून त्यांच्यामुळे प्रत्येक महिला आता सक्षम होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी व लाडकी बहिण योजनेचा जास्तीत जास्त महिलांना लाभ मिळवून देण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.











आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...

## जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स्

पोंधवडी, ता.करमाळा., जि.सोलापूर

**• राजस्थान दर्शन**
जयपुर, पुष्कर, बिकानेर, जेसलमेर
जोधपूर, उदयपूर, चित्तोडगड
कालावधी : दि.१८/११/२०२४ ते २९/११/२०२४
सहल खर्च : रू.२४,५००

**• नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी)
वाराणसी, गोरखपूर, प्रयागराज, काठमांडू
मनोकामना, लुंबिनी, अयोध्या, पोखरा
कालावधी : दि.१८/१२/२०२४ ते ३१/१२/२०२४
सहल खर्च : रू.२५,०००

**• काशी दर्शन**
काशी, गया, आयोध्या, प्रयाग
कालावधी : दि.१८/१२/२०२४ ते २६/१२/२०२४
सहल खर्च : रू.१३,१००

**• गुजरात दर्शन**
गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ
नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम
कालावधी : दि.२/१/२०२५ ते ८/१/२०२५
सहल खर्च : रू.११,०००

**• कन्याकुमारी दर्शन**
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई,
रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी : दि.१६/१/२०२५ ते २६/१/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

**• गंगासागर दर्शन**
गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी
भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
कालावधी : दि.३०/१/२०२५ ते ७/२/२०२५
सहल खर्च : रू.१२,८००

**• केरळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी)
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार
त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, मधुराई, रामेश्वरम्
कालावधी : दि.११/२/२०२५ ते २३/२/२०२५
सहल खर्च : रू.३१,५००

**• वैष्णोदेवी, कार्श्मिर, अमृतसर दर्शन**
माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग,
सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
सहल खर्च रू.२६,०००

**• वैष्णोदेवी दर्शन**
माता वैष्णोदेवी, शिवखोरी, जम्मू
अमृतसर, अटारी बॉर्डर, दिल्ली
कालावधी : दि.९/३/२०२५ ते १७/३/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

**• मथुरा दर्शन**
मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन,
बरसाना, गोवर्धन पर्वत, नंदगाव
कालावधी : दि.२२/३/२०२५ ते २८/३/२०२५
सहल खर्च : रू.९,१००



• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था
• राहण्याची उत्तम सोय



संपर्क
**श्री.मयुर राऊत**
**बुकींग सुरू**
मो.८८८८३३३६३८ / ९६८९४८८५८५

## शिक्षण क्षेत्रातील महामेरू
# सुखदेव साखरे सर

राजुरी गावच्या सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीत ज्यांचा वाटा आहे; अशा आपल्याला सहवास लाभलेल्या बऱ्याच व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेल्या. यातच परवा अजातशत्रू व्यक्तीमत्व साखरे सरांच्या जाण्याने तर समस्त ग्रामस्थांच्या मनाला चुटपूट लागून राहिली. एक भाऊ, पती, पिता, आजोबा गेले याबरोबरच पंचक्रोशीतील एक कर्मयोगी गेला ही खूप मोठी आणि कधीही न भरून येणारी सामाजिक हानी आहे. साखरे सरांनी प्रतिकुल परिस्थितीत ज्ञानार्जन करून पंचक्रोशीतील माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांना सहजपणे शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात अत्यंत मोलाची भुमिका पार पाडली. सरांच्या या जडणघडणीत बंधू आप्पा, अण्णा, विजया नानी यांच्या त्याग आणि सहकार्याचे महत्वपूर्ण योगदान आहे.



माझ्या दृष्टीने शिक्षण क्षेत्रातील शिकवण्यासाठी सर्वात अवघड विषय म्हणजे भाषा विषय आणि ती भुमिका सरांनी अगदी लिलया पार पाडली. साखरे सर, मीरा रामनवमीवाले, सत्यपाल श्रीवास्तव, डॉ.महेंद्र कदम (यशवंतराव महाविद्यालय), प्रविण दवणे (ज्ञानसाधना महाविद्यालय) या मला लाभलेल्या व अनुभवलेल्या विविध भाषा शिक्षकांच्या यादीत सर्वोच्च स्थान सरांना जाते. प्रवास वर्णन, लोककथा, आत्मकथा, निसर्ग कविता, व्याकरण यातला कोणताही विषयपाठ असो, सरांच्या अध्यापनाची विशेष हातोटी होती.


संपूर्ण जीवनकाळात सरांनी कमावलेल्या भौतिक संपत्तीत कोणाचीही तळमळ दिसणार नाही. त्या काळात मनात आणले असते तर कितीही अर्थाजन करू शकले असते इतका समाजमनावर त्यांचा प्रभाव होता. पण समाजमनाच्या या विश्वासाला सरांनी कधीही तडा जाऊ दिला नाही. त्यांच्या या तत्वनिष्ठतेचे फळ त्यांच्या पुढील वारसांना नक्कीच मिळेल.

एखाद्या व्यक्तीने संपूर्ण जीवन काळात ज्या गोष्टीचा व्यासंग केला तीच गोष्ट शेवटच्या काही क्षणापर्यंत करावी, अगदी तसंच सरांनी पण त्यांच्या अमोघ वाणीने, उपस्थितांना ज्ञानदान करूनच आपली जीवनयात्रा संपवली. माझ्या दृष्टीने कोणत्याही तिथीवार आणि मुहूर्तापेक्षा हे मरण उच्च कोटीचे आहे. महाभारतातील संजयला जशी दिव्यदृष्टी लाभली. त्यायोगे त्याने राजमहालात बसून अंध राजा धृतराष्ट्राला कुरूक्षेत्रा वर घडत असलेल्या युध्द प्रसंगाचे वर्णन, समालोचन केले जणू काय अगदी अशीच दिव्यदृष्टी साखरे सरांना अंतिम क्षणी प्राप्त झाली की काय असे सहज मनात आले. आणि त्या दिव्यदृष्टीच्या आधारेच पृथ्वीलोकात वावरत असताना स्वर्गदेवतेचे आमंत्रण घेऊन आलेल्या दुतांचे अस्तित्व जाणवल्याने सरांनी उपस्थित श्रोत्यांना जीवनाचे अंतिम सार कथन केले आणि मंत्रमुग्ध होवून सर्वांनी त्यांचे श्रवण केले आणि त्या श्रोत्यांसोबतच मलाही सरांचे शेवटचे वक्तृत्व ऐकायला मिळाले हे माझे परमभाग्यच..! सरांच्या या आकस्मिक निधनामुळे विजया नानी, कन्या माई, स्वाती, राणी, सर्व जावई, सुपुत्र धनंजय सर व समस्त साखरे कुटूंबाला हे डोंगराएवढं दु:ख पचविण्याचे बळ मिळो; ही पांडुरंग चरणी प्रार्थना..!

**....तुकाराम देविदास जाधव**
राजुरी, ता.करमाळा

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!

## चिवटे उपहारगृह



| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सँडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>मैसुरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.

एकवेळ अवश्य भेट द्या..!

राशिनपेठ, करमाळा. मो.९००६९४३००६

कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.



कै.सुखदेव साखरे सर
(मृत्यू दि.९/९/२०२४)

# भावपूर्ण श्रध्दांजली !

मनी होता भोळेपणा, कधी न दाखविला मोठेपणा
चेहरा होता सदा हसमुख, सर्वांना दिला आनंद खूप
शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानदान करून, अनेक विद्यार्थी घडविले
गावाच्या विकासात्मक वाटचालीत दिली मोलाची साथ
नाना.. आपल्या या कार्याची घेऊ आम्ही स्फुर्ती
परतुनी यावे तुम्ही हीच आमची
श्रध्दांजली !

वैजनाथ स्वामी सेवा मंडळ या शैक्षणिक संस्थेचे
संस्थापक/संचालक आणि श्री राजेश्वर विद्यालय, राजुरी प्रशालेचे माजी मुख्याध्यापक

## कै.सुखदेव तात्याबा साखरे सर (नाना)

यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. खरंतर साखरे सर रूपी राजुरीच्या मार्गदर्शक क्षितिजावरील एक तारा निखळला. सरांच्या आत्म्यांस चिरशांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना व त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !

**शोकाकुल**

ईश्वर तोरडमल सर, डॉ.भैरवनाथ बागल, डॉ.सचिन तोरडमल सर. उदयसिंह पाटील
धनंजय साखरे सर, उदयसिंह साखरे, शिवाजी साखरे, महेंद्र साखरे, रेवणनाथ साखरे, संजय साखरे सर

**समस्त साखरे, बागल, तोरडमल परिवार**

# ॥ द्वितीय पुण्यस्मरण ॥



कै.अर्जुन नरहरी नलवडे

आपल्या छायेविना.., सर्वकाही वाटे अपूर्ण
कोणत्याही धनसंपत्तीने सुध्दा
न होई कधी ही पोकळी पूर्ण
पुनर्जन्म घ्यावा तुम्ही आमच्यासाठी हीच आमची

**द्वितीय पुण्यस्मरणदिनी भावपूर्ण आदरांजली !**

**टीप :** द्वितीय पुण्यस्मरणदिनानिमित्त **दि.२३/९/२०२४ रोजी सकाळी १० वा.** सामाजिक कार्यकर्ते व संत साहित्याचे अभ्यासक **ॲड.डॉ.बाबूराव हिरडे** यांचे **'नलवडे निवास' शिवाजीनगर, करमाळा.** येथे प्रबोधनपर व्याख्यान होणार आहे.

**अभिवादक**
**श्री.आप्पाराव नरहरी नलवडे**
**श्री.अमरजीत अर्जुन नलवडे व परिवार**





सोलापूर जिल्ह्यातून भारतीय धनुर्विद्या संघात निवड झालेली पहिली मुलगी तसेच वरकुटे, ता.करमाळा चे नाव अशियाई खंडात गाजवणारी मुलगी

## कु.वैष्णवी कुमार पाटील

हिस चीन(तैपेयी) येथे दि.२७ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या **आशियाई चॅम्पीयनशीप स्पर्धेसाठी**

**हार्दिक शुभेच्छा**

**शुभेच्छुक**
**पाटील परिवार व वरकुटे ग्रामस्थ**
**एकलव्य आश्रमशाळा, करमाळा.**